नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/12/2021 (शुक्रवार)

## गांजाची साठवणुक करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणची कारवाई

दिनांक 09/12/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो स्टे उमरेड हद्दीत गस्त करीत असतांना माहितगार कडून गोपनीय माहिती मिळाली की, इतवारीपेठ उमरेड येथील मोंटू उर्फ शरीफ शेख नावाचा इसम हा त्याचे राहते घरी अंमली पदार्थ गांजा बाळगून अवैधरित्या त्याची विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने मिळालेल्या माहिती प्रमाणे आरोपी नामे– मोंटू उर्फ शरीफ नबी शेख, वय 33 वर्ष, रा. न्यू चिकन मार्केट, इतवारीपेठ उमरेड, त. उमरेड, जि. नागपूर याच्या घरी जावून घरझड़ती घेतली असता त्याचे ताब्यातून 634 ग्रॅम अंमली पदार्थ गांजा किमती 6340/–रू. व नगदी 2800/–रु. असा एकूण कि 9,140/–रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. सदर कारवाई दरम्यान मिळालेला मुद्देमाल जप्त करून आरोपीं विरुद्ध पोलिस ठाणे उमरेड येथे अप. क्र. 782/2021 कलम 20, 22 NDPS ACT अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहूल माकणीकर पोलिस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनात सदरची सहा.पो.नि. श्री जितेंद्र वैरागडे, पोहवा राजेंद्र सनोडिया, नरेंद्र पटले, पोना सत्यशील कोठारे, पोशी अजीज दुधकानोज, बालाजी साखरे, रोहन डाखोरे, मपोशी रुपाली, चालक अमोल कुथे यांनी पार पाडली.



## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावरील पो.स्टे. देवलापार येथे दिनांक 09/12/2021 चे 05.30 वा. ते 06.00 वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–31/ सीआर– 1343 क्रमांकाच्या चारचाकी क्लासिक गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– 1) शेख इब्राहिम शेख ईस्माईल रा. बेले नगर कळमना नागपूर व 2) सोयाब अख्तर फकरू शेख रा कामठी नागपूर यांच्या ताब्यातुन 5(बैले) जनावरे कि. 50,000/–रू. चे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 6,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार गजानन माहुरे, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(डि)(एफ)(एस) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम तसेच कलम 34 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री केशव पुंजरवाड मो.क्र. 8668865203 हे करीत आहेत.



## दरोडा

पो.स्टे. खापरखेडा :–अंतर्गत 05 कि.मी अंतरावरील रोहना रोड झुला लाईन येथे दिनांक 08/12/2021 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल प्रभाकर गोमकाळे, वय 33 वर्ष, धंदा– संगणक इन्स्टीटयुट व ठेकेदारी रा. एमएसीबी रा. वार्ड क्र 1 रोहना ता सावनेर जिल्हा नागपुर व आरोपी हे एकाच गावातील रहिवासी असून फिर्यादी हा सावीत्रीबाई महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्था येथून कर्ज स्वरूपात काढलेले 3,00,000/–रूपये बॅग मध्ये घेवून मोटरसायकल ने आपले मित्रा सोबत जात असतांना रोहना रोड झुला लाईन जवळ 1) पप्पु प्रसाद 2) पंकज खापरे 3) शंतनु गोमकाळे 4) भुषण गोमकाळे 5) हार्दीक वानकर 6) गणेश गायकवाड 7) योगेश कोरडे 8) विलास मंगळुकर 9) अमि गोमकाळे व इतर 10 ते 12 आरोपी फिर्यादीची मोटरसायकल अडवून 6 ते 7 मोटरसायकल वरील लोकांनी फिर्यादीस घेरले व त्यास रॉड, काठया व हातबुक्कीने मारहाण केली. तेव्हा फिर्यादीला भिती वाटल्याने तो जिवाच्या भितीने पळतांना कोणीतरी फिर्यादीच्या गाडीला लागलेल्या बॅगेतून 3,00,000/– रूपये काढले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 147,148,149,323,395 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अंधारे मो.क्र. 9823150134 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 05/12/2021 चे 15.00 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय 31 वर्ष ही आपल्या मुलाला सोबत घेवुन शेतात तुरीचा शेंगा तोडण्याकरीता पायदळ जात असता आरोपी नामे– महेंद्र रमेश मेश्राम, वय वर्ष, रा. सिंधी झुनकी ता. कळमेश्वर याने फिर्यादीचा पाठलाग करून 'मी तुझ्यावर प्रेम करतो, तु मला शेतात एकटी भेटण्याकरीता ये' त्यामुळे फिर्यादीचा मनाला लज्जा वाटली 'तु जर मला भेटायला आली नाही तर तुझ्या पतीला व मुलाला मारून टाकील' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354,354(अ),506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जिचकार मो. क्र. 9923168573 हे करीत आहे.

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापरखेडा :–अंतर्गत 2 कि.मी अंतरावरील शांतीनगर वार्ड क्र 02 खापरखेडा येथे दिनांक 09/12/2021 चे 14.00 वा. ते 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मंगेश रमेश माकडे वय 28 रा शांतीनगर वार्ड क्र 02 खापरखेडा हे नविन मीटर लावण्याचे कामावर असतांना आरोपी नामे– आस्तीक बागडे याने 'तु माझ्या दुकानाचे विदयुत पुरवठा का खंडीत केला होता' असे फिर्यादीला म्हणुन त्याचे गालावर थापड मारली व लोखंडी रॉड उचलुन अंगावर धावुन आला. फिर्यादी हा शासकीय काम करीत असता मारहाण करून शासकीय कामात अळथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 353 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि धोपाडे मो नं 9923047079 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. अरोली – दिनांक 09/12/2021 चे 16.00 वा. ते 16.30 वा. चे सुमारास पो.स्टे. अरोली हद्दीत फिर्यादी यांची 12 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि श्री अशोक कोळी हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत श्याम नगर निखाडे ले आउट बोरी ता हिंगणा जि. नागपुर येथे दिनांक 09/12/2021 चे 12.30 वा. दरम्यान चंद्रभान हरीभाउ लांजेवार (मृतक), वय 48 वर्ष, रा. श्याम नगर निखाडे ले आउट बोरी ता हिंगणा जि. नागपुर हा काही दीवसापुर्वी पडल्याने त्याचे हाताला फॅक्चर होता व तो सध्या घरीच राहत होता. त्याची आर्थिक परीस्थीती चांगली नसल्याने तो नेहमी विचारात राहत होता त्यामुळे त्याने घरातील बेडरूम मध्ये दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शिवम चंद्रभान लांजेवार वय 17 वर्ष रा. श्याम नगर निखाडे ले आउट बोरी ता हिंगणा जि नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक देव्हारे मो.क्र. 9822394597 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर